**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर – ४१६ ००४.**

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.कोविमं/ १२वी/प्रात्यक्षिक/ 5546
दिनांक:- १०/११/२०२०

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय:-माध्यमिक (इ.१०वी) व उच्च माध्यमिक (इ.१२वी) प्रमाणपत्र परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर.२०२० शास्त्र प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षेचे साहित्य वितरणाबाबत.**

संदर्भ:- १. क्र.कोविमं/उच्च माध्यमिक/प्रात्यक्षिक/दिनांक ०२.११.२०२० चे परिपत्रक.
२. क्र.कोविमं/माध्य.गोप.परीक्षा/५४६४ दिनांक ०४.११.२०२० चे परिपत्रक.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय परिपत्रक मंडळाच्या संकेत स्थळावर टाकलेले कृपया अवलोकित व्हावे.

प्रात्यक्षिक तोंडी अंतर्गत मुल्यमापन परीक्षेचे गुण ओएमआर गुणतक्त्यामध्ये नोंदविण्यासाठी सदरची ओएमआर पध्दतीचे गुणतक्ते, श्रेणीतक्ते (ग्रेडलिस्ट) व प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेच्या उत्तरपत्रिका व अनुषंगिक साहित्य **गुरुवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२० रोजी सकाळी १०.०० ते ४.००** या वेळेत आपल्या वितरण केंद्रावर वाटप करण्यात येणार आहे.

उपरोक्त साहित्य स्विकारण्यासाठी आपला प्रतिनिधी आपल्या सही शिक्क्यानिशी अधिकार पत्र घेवून संबंधित वितरण केंद्रावर वेळेत पाठविण्यात यावा. साहित्य स्विकारण्यास येणाऱ्या प्रतिनिधींनी साहित्य आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयाचे असल्याचे खात्री करुन स्विकारावे. **इ.१२ वी** प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण झाल्यानंतर परीक्षोत्तर साहित्य ओएमआर पध्दतीचे गुणतक्ते, श्रेणीतक्ते यापूर्वीच कळविलेल्या तारखेस म्हणजे **शुक्रवार दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजी सकाळी १०.०० ते ४.०० या** वेळेत आपल्या वितरण केंद्रावर जमा करण्यात यावीत. **इ.१०वीचे** साहित्य वितरण केंद्रावर दिनांक ०७.१२.२०२० रोजी जमा करण्यात यावे.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर -४.

**प्रति,**

**वितरण केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, प्रात्यक्षिक परीक्षा पूर्व साहित्य दिनांक १२.११.२०२० रोजी कनि.महविद्यालयांना वितरित करावे व प्रात्यक्षिक परीक्षेचे परीक्षोत्तर साहित्य दि.११/१२/२०२० रोजी स्विकारून सदरचे साहित्य (उत्तरपत्रिका, देयक, ओएमआर गुणतक्ते,श्रेणीतक्ते, गैरहजर पाकीटे इत्यादी याप्रमाणे कनि.महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय) वर्गीकरण करून शनिवार दिनांक १२/१२/२०२० रोजी मंडळ कार्यालय, कोल्हापूर येथे सकाळी १०.०० ते २.०० या वेळेत पोहोच करावे.**